# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक २९/०६/२०२६ (सोमवार )**

---

## प्रतिबंधीत सुगंधित तंबाखुची वाहतुक करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद,
## ७ लाख ३३ हजार ८४० रूपयांचा मुद्देमाल जप्त
## स्थानिक गुन्हे शाखा नागपूर ग्रामीणची कामगिरी

**पोलीस स्टेशन सावनेर** :— दिनांक २७/०६/२०२६ रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक सावनेर उपविभागात पेट्रोलींग करीत असतांना गुप्त बातमीदारद्वारे माहिती मिळाली की, चारचाकी वाहनाने अवैधरित्या प्रतिबंधीत सुगंधीत तंबाखुची वाहतुक होत आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी पोलीस स्टेशन सावनेर हद्दीतील मौजा माळेगाव येथे पांढुर्णा ते नागपूर रोडवर कॉटन मिल समोर नाकाबंदी केली नाकाबंदी दरम्यान संशयित इको स्पोर्ट्स कार क्र. एम एच—४९/बी ४६४२ हे वाहन मिळुन आले. पोलीसांनी वाहन थांबवुन नमुद वाहनाची पंचासमक्ष तपासणी केली असता प्रतिबंधीत असलेला सुंगधीत तंबाखु मिळुन आला.

**पोलीसांनी पंचासमक्ष वेगवेगळया कंपनीचा एकुण १५५.२४९ किलोग्रॅम सुगंधित तंबाखु किंमती २,३३,८४०/— रूपये इको स्पोर्ट्स कार क्र. एम एच—४९/बी ४६४२ किंमती ५,००,०००/—रूपये, असा एकुण ७,३३,८४०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. नमुद आरोपी नामे मोहम्मद बिलाल मोहम्मद सईद अन्सारी, वय २८ वर्ष, रा. योगी अरविंद नगर, शितला माता मंदीर च्या जवळ, नागपूर याने सदर प्रतिबंधीत सुगंधीत तंबाखु मानवी जिवीतास अपायकारक आहे. तसेच महाराष्ट्र शासनाने त्याचे उप्तादन, विक्री, साठा व वाहतुकीवर प्रतिबंध लावलेला आहे हे माहीती असतांना सुध्दा प्रतिबंधीत अन्नपदार्थाची विक्री करण्याच्या हेतुने साठा व वाहतुक केली आहे. नमुद आरोपीविरूद्ध पोस्टे सावनेर येथे**

**भारतीय न्याय संहीता २०२३ चे कलम १२३, २७४, २७५, २२३ सह कलम अन्न सुरक्षा आणि मानके अधिनियम अन्वये गुन्हा नोंद केला आहे.**



## खुनाचा प्रयत्न करणाऱ्या आरोपीला मा. न्यायालयाने सुनावली शिक्षा

**पोलीस स्टेशन काटोल** :— फिर्यादी नामे सौ. करीश्मा सुदर्शन बोरकर, वय २५ वर्ष, रा. आमनेर, ता. वरूड, जि. अमरावती यांच्या तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन काटोल येथे अप क्र. १०३/२०२२ कलम ३०७ भादवी अन्वये गुन्हा नोंद झालेला होता. सदर गुन्हयाची हकीकत याप्रमाणे आहे की, दिनांक १८/०२/२०२२ रोजी यातील फिर्यादी व आरोपी सुदर्शन अशोक बोरकर, वय २४ वर्ष, रा. आमनेर, ता. वरूड, जि. अमरावती हे पती पत्नी असुन ते वेगवेगळे राहत होते. फिर्यादीने पतीचे त्रासाला कंटाळुन पोस्टे काटोल येथे तक्रार दिल्याने या रागातून तसेच आरोपीने फिर्यादीस तक्रार मागे घे असे म्हटले होते परंतु फिर्यादीने तक्रार मागे घेण्यास नकार दिल्याने आरोपी पतीने फिर्यादीच्या डोक्यावर, मानेवर चाकुने मारून व तिचा गळा दाबुन जिवानीशी ठार मारण्याचा प्रयत्न केला.

**प्रथम तपासी अधिकारी पोलीस उपनिरीक्षक श्री परमेश्वर आगासे यांनी प्राथमिक केला असुन तपासी अधिकारी पोलीस निरीक्षक श्री. महादेव आचरेकर यांनी सदर प्रकरणाचा सखोल तपास करून आरोपी विरूध्द सबळ पुराव्यानिशी दोषारोपत्र मा. न्यायालयात दाखल केले. दिनांक २९/०६/२०२६ रोजी मा. जिल्हा व सत्र न्यायधीश क्रं ०७ श्री. ए. ए. जोगळेकर यांनी नमुद आरोपी नामे सुदर्शन अशोक बोरकर, वय २४ वर्ष, रा. आमनेर, ता. वरूड, जि. अमरावती यास कलम ३०७ भादवि मध्ये ५ वर्ष सश्रम कारावास व ५००० /— रूपये दंड , दंड न भरल्यास ६ महिने सश्रम कारावास, कलम ३४२ भादवि मध्ये १ वर्ष सश्रम कारावास व १००० /— रूपये दंड , दंड न भरल्यास ३ महिने सश्रम कारावास अशी शिक्षा सुनावली आहे.**

सरकारचे वतीने ए.पी.पी. एम एस कमलाकर यांनी काम पाहीले. सदर खटल्याच्या सुनावली दरम्यान श्री पराग पोटे, उपविभागिय पोलीस अधिकारी, काटोल उपविभाग, पोलीस निरीक्षक श्री. रणजित शिरसाठ, प्रभारी अधिकारी पोलीस स्टेशन काटोल, पोलीस निरीक्षक श्री विशाल गिरी, दोषसिध्दी कक्ष, नागपुर ग्रामीण, सपोनि श्री विशांत नांदगाये, पोहवा श्री रामदास कोराम, ब.नं २२४ , नेम. दोषसिध्दी कक्ष, नागपुर ग्रामीण यांनी महत्वपुर्ण योगदान दिले. कोर्ट कामात पैरवी पोहवा बाबा नेवारे, ब. नं. ८२ पोलीस स्टेशन काटोल यांनी मदत केली आहे.

## रामटेक पोलीसांनी तांत्रिक व कौशल्यपूर्ण तपास करून २४ तासाच्या आत प्राणांतिक अपघातातील अज्ञात आरोपी आणि वाहन निष्पन्न केले

पोलीस स्टेशन रामटेकः— **दिनांक २८/०६/२०२६ रोजी पोलीस स्टेशन रामटेक हद्दीतील मौजा वाहीटोला येथे दुपारी अंदाजे ०२.१५ ते ०२.४५ वाजताच्या दरम्यान एका लाल रंगाच्या चारचाकी वाहनाच्या चालकाने वाहन भरधाव व निष्काळजीपणे चालवून कु. काव्या संजय अनकर, वय ०९ वर्षे आणि कु. प्रार्थना अजय कठौते ,वय १३ वर्षे, रा. वाहीटोला या दोन्ही मुलींना धडक दिली. या अपघातात कु. काव्या संजय अनकर हिचा मृत्यू झाला, तर कु. प्रार्थना अजय कठौते ही गंभीर जखमी झाली. याप्रकरणी पोलीस स्टेशन रामटेक येथे कलम १०६(१), १२५(अ), १२५(ब) भारतीय न्याय संहिता सह कलम मोटार वाहन कायदा कलम**

**१३४ अन्वये गुन्हा नोंद करून तपास सुरू करण्यात आला. घटनेनंतर आरोपी चालक घटनास्थळावरून वाहनासह पळुन गेला होता.**

**आरोपीची कोणतीही ओळख उपलब्ध नव्हती तसेच घटनास्थळी आरोपीपर्यंत थेट पोहोचता येईल असे कोणतेही ठोस भौतिक पुरावे उपलब्ध नव्हते. आरोपी शोध कामी मा. श्री. हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण तथा श्री. अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण श्री. रमेश बरकते, उपविभागीय पोलीस अधिकारी, रामटेक यांच्या मार्गदर्शनाखाली अशा प्रतिकूल परिस्थितीत रामटेक पोलिसांनी घटनास्थळाचा बारकाईने अभ्यास करून, विविध तांत्रिक बाबींचे विश्लेषण, तांत्रिक तपास पद्धतीचा प्रभावी वापर करून आरोपीचा शोध घेत २४ तासाच्या आत नमुद गुन्हयात आरोपी नामे राजेश छोटेलाल लाड, वय ५७ वर्ष, रा. प्लॉट न. १९, मानव नगर, टेकानाका, नारी रोड, नागपूर याने त्याचे वाहन क्रं एम एच ४० ए ६७२२ या वाहनाने अपघात केल्याचे निष्पन्न केले आहे.**

## ७८.०७ ग्रॅम गांजासह वाहन असा एकुण १ लाख ८३ हजार रूपयांचा मुद्देमाल जप्त,रामटेक पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन रामटेक :—** दिनांक २८/०६/२०२६ रोजी रामटेक पोलीस टक्कामोरे लॉनचे समोर नाकाबंदी करीत असतांना पल्सर २२० एम. एच. ४०/डी.जे. २०३८ वरील दोन इसमांना पोलीसांनी वाहन थांबविण्याचा इशारा केला असता मागे बसलेला इसम मोटर सायकल वरून उतरून पळुन जावु लागला. पोलीसांचा संशय बळावल्याने त्यांनी शिताफिने आरोपीला पकडुन त्यांची चौकशी केली असता नामे पळुन जाणारा आरोपी **१) अजय रमेश बंधाटे, वय २६ वर्षे आणि मोटर सायकल चालक आरोपी २) यश ढोंडबाजी कामडी, वय २४ वर्षे, दोन्ही रा. नगरधन ता.रामटेक** अशी माहीती प्राप्त झाली. पंचासमक्ष झडती घेतली असता आरोपी नामे १) अजय रमेश बंधाटे, वय २६ वर्षे याच्या हातातील पिशवी मध्ये गांजा सदृश्य पदार्थ मिळुन आला.

**नमुद आरोपीच्या ताब्यातुन १) अंमली पदार्थ गांजा ७८.०७ ग्रॅम किंमती ३०००/—रुपये आणि २) पल्सर २२० दुचाकी क्रं एम. एच. ४०/डी.जे. २०३८ किंमती १,५०,०००/—रुपये आणि दोन ॲडरॉईड मोबाईल किंमती ३०,०००/—रूपये असा एकुण**

**१,८३,०००/— रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. नमुद प्रकरणी आरोपीतांविरूद्ध पोलीस स्टेशन रामटेक येथे कलम ८(क), २० (ब), (ii),(अ) एन.डि.पि. एस. कायदयान्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. नमुद गुन्हयात साखळी पुरावे जोडुन नागपुर ग्रामीण पोलीस पुढील तपास करीत आहेत.**

## अंमली पदर्थ गांजा ची विक्री करणाऱ्या आरोपी विरूध्द गुन्हा नोंद, कोंढाळी पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन कोंढाळी** :— दिनांक २७/०६/२०२६ रोजी कोंढाळी पोलीसांना गुप्त बातमीदाराने खात्रीशीर माहीती दिली की, **वार्ड क्र. ४, बाजारगाव येथे एक महीला** अंमली पदार्थ गांजा बाळगुन गांजाची विक्री करत आहे. मिळालेल्या महीतीच्या आधारे पोलीसांनी घटनास्थळी नमुद महीला आरोपीच्या घराची झडती घेतली असता आरोपीच्या घरी हिरवट ओलसर **अंमली पदार्थ गांजा सदृश्य पदार्थ मिळुन आला.**

**पोलीसांनी पंचासमक्ष ३१ ग्रॅम गांजा एकुण किंमत १,०००/— रूपये ,गांजा विक्री करून मिळवलेली रोख रक्कम २,४२०/— रूपये चा, असा एकुण किंमत ३४२०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आला आहे.नमुद प्रकरणी महीला आरोपी विरूद्ध पोलीस स्टेशन कोंढाळी येथे कलम ८(क),२०(ब) (ii)एन.डि.पि.एस. कायदयान्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे .**

## प्रतिबंधीत सुगंधित तंबाखुची विक्री करीता साठवणुक करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद, भिवापूर पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन भिवापूर** :— दिनांक २७/०६/२०२६ रोजी भिवापूर पोलीसांना गुप्त बातमीदारद्वारे माहिती मिळाली की, पोलीस स्टेशन भिवापूर हद्दीत मौजा तास येथे लकी प्रकाश श्रीरामे याने त्याचे पान शॉपमध्ये महाराष्ट्रात प्रतिबंध असलेला सुगंधित तंबाखु पदार्थ विक्री करीता साठा करून ठेवला आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी मौजा तास येथे लकी प्रकाश श्रीरामे, वय २१ वर्ष, रा. तास, ता. भिवापुर, जि. नागपुर याच्या पान शॉपची पंचासमक्ष घरझडती घेतली असता महाराष्ट्र राज्यात प्रतिबंधीत असलेला सुंगधीत तंबाखु मिळुन आला. **पोलीसांनी घटनास्थळावरून पंचासमक्ष एकुण ७५० ग्रॅम प्रतिबंधीत सुगंधीत तंबाखु किंमती ७५०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.**

**नमुद आरोपीने सदर प्रतिबंधीत सुगंधीत तंबाखु मानवी जिवीतास अपायकारक आहे. तसेच महाराष्ट्र शासनाने त्याचे उप्तादन, विक्री, साठा व वाहतुकीवर प्रतिबंध लावलेला आहे हे माहीती असतांना सुध्दा प्रतिबंधीत अन्नपदार्थाची विक्री करण्याच्या हेतुने साठा केला होता. आरोपी लकी प्रकाश श्रीरामे, वय २१ वर्ष, रा. तास, ता. भिवापुर, जि. नागपुर जि नागपुर यांचेविरूद्ध पोस्टे भिवापूर येथे अन्न सुरक्षा आणि मानके अधि. २००६ सहकलम १२३, २७४, २७५, २२३ भारतीय न्याय संहीता अन्वये गुन्हा नोंद केला आहे.**

## अवैधरित्या ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळणाऱ्या ६ आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद. वाहनासह १ लाख ७२ हजार ८१० रूपयाचा मुद्देमाल जप्त पाचगाव पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन पाचगाव** :— दिनांक २८/०६/२०२६ रोजी पाचगाव पोलीसांना गुप्त बातमीदारा मार्फत खात्रीशीर माहीती मिळाली की, मौजा भिवापूर शिवारात बस स्टॉपचे मागे झाडी झुडपात काही इसम ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळत आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पाचगाव पोलीसांनी सापळा रचुन घटनास्थळी धाड टाकली असता, नमुद घटनास्थळी काही इसम ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळताना दिसुन आले. पोलीसांनी **आरोपी नामे क्र १)**

तुषार दिनेश ठवरे, वय २९ वर्ष, रा. तिखाडी, तह उमरेड क्र २) स्वप्नील राजु बनसोड, वय २५ वर्ष, रा. उदासा उमरेड जि नागपुर क्र ३) प्रकाश कवडुजी शेद्रे, वय ४० वर्ष, रा. उटी, तह उमरेड जि नागपुर यांना जागीच पकडले. तसेच त्यांच्यासह आरोपी क्र ४) नामे मनोज पवार वय ४० वर्षे, रा राजुरवाडी, जि नागपुर, क्र ५) नामे पंकज पवार, वय ३० वर्षे, रा. राजुरवाडी जि नागपुर आणि आरोपी क्र ६) अनिस गोवर्धन राजपुत, वय २६ वर्षे, रा. राजुरवाडी जि नागपुर हे तिघे सुध्दा जुगार खेळत असल्याची माहीती पोलीसांना प्राप्त झाली.

पोलीसांनी घटनास्थळावरून १) ५२ तासपत्ते व रोख रक्कम २८१०/— रूपये २) ०१ विनाक्रमांकाची मोपेड वाहन टिव्हीएस ज्युपीटर किंमती ९०,०००/—रूपये ३) ०१ मोटरसायकल शाईन क्र एम एच ४० डी बी २०१२ किंमती ८०,०००/—रूपये असा एकुण १,७२,८१०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. नमुद ०६ आरोपीतांविरूद्ध पोलीस स्टेशन पाचगाव येथे कलम १२ महाराष्ट्र जुगार अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.



मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने